REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 3 | DECEMBER - 2023

# पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या व्यवसाय-उद्योगात झालेल्या आर्थिक बदलांचे विश्लेषणात्मक अध्ययन

हरिदास प्रतापसिंग सोळंके[१] , प्राचार्य डॉ. रामेश्वर मा. भिसे[२]
[१]संशोधनकर्ता , सेठ, ग. श्री. मुरारका कनिष्ठ महाविद्यालय, शेगांव, जिल्हा बुलडाणा (महा.).
[२] श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,जि. अमरावती.



**सारांश**

प्रस्तुत संशोधणात पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजनेतील एकुण ५०० लाभार्थ्यांकडून संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता गैर-प्राचल काई वर्ग परीक्षण (No-parametric chi square test) चा वापर करण्यात आला. विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले. संकलित केलेली माहिती विभागवार वर्गीकृत करण्यात आली. प्रत्येक सारणी खाली त्या सारणीतील माहितीचे स्पष्टीकरण देण्यात आले व स्पष्टीकरणाअंती परिणाम देखील प्रस्तुत करण्यात आले.

## प्रस्तावना

ग्रामीण औद्योगिकीकरणाला पाठिंबा देण्यासाठी संस्थात्मक वित्त क्षेत्रात केंद्र सरकारचा हस्तक्षेप प्रासंगिक आणि समयोचित आहे. ग्रामीण औद्योगिक क्षेत्रासाठी अधिक कर्ज सुविधांना प्रोत्साहन देण्यासाठी, सरकारने अनुदानित व्याजदरांसह सुलभ अटींवर अधिक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी धोरणे आखली आहेत. परिणामी, केंद्र सरकारने वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत २०१५ मध्ये प्रधान मंत्री मुद्रा योजना (PMMY) सुरू केली आहे. ज्यामुळे बिगर-कॉर्पोरेट लघु उद्योग क्षेत्राला आर्थिक सुविधेचा औपचारिक प्रवेश प्रदान करण्यात आला आहे. अर्थव्यवस्थेच्या अनौपचारिक क्षेत्रातील सूक्ष्म उद्योजक आणि स्वयंरोजगार असलेल्या लोकांच्या पत गरजा पूर्ण करण्यासाठी हा एक सकारात्मक प्रयत्न आहे. आर्थिक समावेशासाठी ही पर्यायी निधीची यंत्रणा मानली जाते.

प्रधान मंत्री मुद्रा योजनेंतर्गत, मुद्रा लि. - मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्सिंग एजन्सी कंपनी कायदा १९५६ अंतर्गत मार्च २०१५ मध्ये कंपनी म्हणून आणि ८ एप्रिल २०१५ रोजी RBI सोबत नॉन-बँकिंग फायनान्सिंग कंपनी (NBFC) म्हणून समाविष्ट करण्यात आली. या संस्थेची प्रभावी अंमलबजावणीसाठी सुरुवातीला भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI) च्या पूर्ण मालकीची उपकंपनी म्हणून स्थापना करण्यात आली आहे. मुद्रा चे मुख्य उद्दिष्टे म्हणजे उद्योजक आणि स्वयंरोजगार असलेल्या लोकांना त्यांच्या क्षमता वाढवून त्यांना सक्षम करणे आणि त्यांना एक पारदर्शी आणि औपचारिक वित्त व्यवस्था प्रदान करणे. या योजनेचा उद्देश सूक्ष्म उद्योजकांना निधीची तफावत भरून काढणे, पहिल्या पिढीतील उद्योजकांच्या आत्मविश्वासाची पातळी वाढवणे आणि विद्यमान लहान उद्योजकांना त्यांचा व्यवसाय वाढविण्यात मदत करणे, हा आहे. मुद्रा ही पुनर्वित्त संस्था आहे आणि उद्योजकांना थेट कर्ज देणारी संस्था नाही. ते त्याच्या मध्यस्थांना पुनर्वित्त सहाय्य प्रदान करते उदा. बँका, मायक्रो फायनान्स संस्था आणि NBFC, जे बिगरशेती क्षेत्रातील

उत्पादन, व्यापार किंवा सेवा क्षेत्रातील उत्पन्न- उत्पादक क्रियाकलापांसाठी कर्ज देण्याच्या व्यवसायात आहेत आणि जे त्या बदल्यात लाभार्थ्यांना वित्तपुरवठा करतील. निधी नसलेल्या संस्थांच्या विशेषतः लघु उद्योगांच्या गरजा पूर्ण करणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. मुद्रा कर्ज योजनेचे उद्दिष्ट मालकी आणि भागीदारी संस्थांसह सुक्ष्म, लघु व मध्यम क्षेत्रातील उद्योजकांना रु. १० लाखांपर्यंत वित्तपुरवठा करण्याचे आहे. लाभार्थी सहसा लहान उत्पादन युनिट, दुकानदार, फळे आणि भाजीपाला विक्रेते, ब्युटी पार्लर, हेअर कटिंग सलून, वाहतूकदार, फेरीवाले, ट्रक ऑपरेटर आणि मशीन ऑपरेटरमधून येतात. लाभार्थी यादीत समाविष्ट केलेले इतर छोटे उद्योजक आणि व्यावसायिक म्हणजे छोटे उद्योग, कारागीर, दुरुस्तीची दुकाने, खद्य प्रसंस्करण, खाद्य पुरवठा सेवा एकक आणि सेवा पुरवठादार (मनीश अग्रवाल, २०१७). सहकारी संस्था, स्वयं-सहायता गट आणि व्यावसायिकांद्वारे चालवल्या जाणाऱ्या सुक्ष्म, लघु व मध्यम एककांनाही या योजनेतून आर्थिक सहाय्य मिळू शकते.

**सारणी क्रमांक १ : पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांच्या व्यवसायासंबंधी माहिती**

| **व्यवसाय** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| बेरोजगार | ९९ | १९.८ |
| व्यवसाय | ३०१ | ६०.२ |
| गृहिणी | १७ | ३.४ |
| स्वयंउद्योजक | ८३ | १६.६ |
| अन्य | — | — |
| **एकूण** | **५००** | **१००** |
| **काई वर्ग मूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| **५७५.८** | **४** | **<०.०५** |

उपरोक्त सारणी क्रमांक. १ मध्ये पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांच्या व्यवसायासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६०.२ टक्के लाभार्थी हे व्यवसाय करीत असून १९.८ टक्के लाभार्थी हे बेरोजगार होते. त्याचप्रमाणे स्वयंउद्योजक व गृहिणी असणाऱ्या लाभार्थ्यांची टक्केवारी क्रमशः १६.६ टक्के व ३.४ टक्के असल्याचे दिसून आले. पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांची व्यवसायानुसार तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य-५७५.८; स्वातंत्र्यांश-४; P मूल्य <०.०५) फरक निदर्शनास येते.

**सारणी क्रमांक २ : पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांच्या व्यवसायाच्या प्रकारासंबंधी माहिती**

| **व्यवसायाचा प्रकार** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| बेकरी | २० | ५.२ |
| नेट कॅफे | २८ | ७.३ |
| फर्निचर वितरक | ४७ | १२.२ |
| अभियांत्रिकी कार्यशाळा | ८ | २.१ |
| टॅटू शॉप | ८ | २.१ |
| गारमेंट्स | २४ | ६.३ |
| फ्रँचायझी | ८ | २.१ |

| व्यवसायाचा प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| हातमाग दुकान | ३२ | ८.३ |
| स्टुडिओ | १६ | ४.२ |
| शिक्षण सल्लामसलत | ४ | १.० |
| रिसॉर्ट | ८ | २.१ |
| थ्जम | ४ | १.० |
| सलून दुकान | १६ | ४.२ |
| टॅक्सी | ४४ | ११.५ |
| कार्यक्रम व्यवस्थापन | ३ | ०.८ |
| टायर दूकान | ३१ | ८.१ |
| उपहारगृह | ३१ | ८.१ |
| चहाचे दुकान | २० | ५.२ |
| स्टिचिंग सेंटर | ० | ०.० |
| किराण दुकान | ५५ | १४.३ |
| जूस स्टॉल | १९ | ४.९ |
| ठतर | ११८ | ३०.७ |

सारणी क्रमांक २ मध्ये पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांच्या व्यवसायाच्या प्रकारासंबंधी माहिती दर्शविलेली आहे. वरील माहिती वरुन असे दिसून येते की ३०.७ टक्के लाभार्थी इतर (झेरॉक्स, टेलरींग, ब्यूटी पार्लर इत्यादी) प्रकारचा व्यवसाय करीत असून १४.३ टक्के लाभार्थी किराणा व्यवसाय करतात. त्याचप्रमाणे फर्निचर वितरक व टॅक्सी व्यवसाय करणाऱ्या लाभार्थ्यांची टक्केवारी अनुक्रमे १२.२ व ११.५ टक्के होती. तसेच हातमाग दुकान, टायर दुकान व उपहारगृह हे व्यवसाय करणाऱ्या लाभार्थ्यांची टक्केवारी क्रमशः ८.३ टक्के व प्रत्येकी ८.१ टक्के होती. वरील माहितीनुसार ७.३ टक्के, ६.३ टक्के व प्रत्येकी ५.२ टक्के लाभार्थी नेट कॅफे, गारमेंट्स व चहाचे दुकान आणि बेकरी हे व्यवसाय करीत असून ४.९ टक्के, प्रत्येकी ४.२ टक्के आणि प्रत्येकी २.१ टक्के लाभार्थी जूस स्टॉल, स्टुडिओ आणि रिसॉर्ट, टॅटू शॉप व अभियांत्रिकी कार्यशाळा हे व्यवसाय करतात. त्याचप्रमाणे प्रत्येकी १.० टक्के व ०.८ टक्के लाभार्थी शिक्षण सल्लामसलत, जिम व कार्यक्रम व्यवस्थापन व्यवसाय करीत असल्याचे आढळून येते.

**सारणी क्रमांक ३ : पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांच्या व्यवसाय स्थापना वर्षासंबंधी माहिती**

| व्यवसायाचा स्थापना वर्ष | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| ०—१ व ज्ञ | १७३ | ३४.६ |
| १—५ व ि | १८१ | ३६.२ |
| ५—१० व ि | ९७ | १९.४ |
| १० व ापिक्षा जास्त | ४९ | ९.८ |
| **एकूण** | **५००** | **१००** |
| **काई वर्ग मूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| **९६** | **३** | **<०.०५** |

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांच्या व्यवसाय स्थापना वर्षासंबंधी माहिती दर्शविलेली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३६.२ टक्के लाभार्थ्यांना व्यवसाय सुरू करुन १-५ वर्ष झाले असून ३४.६ टक्के लाभार्थ्यांना व्यवसाय सुरू करुन ० -१ वर्ष झाले होते. त्याचप्रमाणे व्यवसाय सुरू करून ५-१० वर्ष व १० पेक्षा जास्त कालावधी झाला असणाऱ्या लाभार्थ्यांची क्रमशः टक्केवारी १९.४ टक्के व ९.८ टक्के असल्याचे आढळून येते. पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांची व्यवसाय स्थापना वर्षानुसार तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य - ९६; स्वातंत्र्यांश-३ : P मूल्य <०.०५) अंतर दिसून येते.

**सारणी क्रमांक ४: पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांना शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनेबद्दल जागरुकते संबंधी माहिती**

| शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनेबद्दल जागरूकता | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४८६ | ९७.२ |
| नही | १४ | २.८ |
| **एकूण** | **५००** | **१००** |
| **काई वर्ग मूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| **४४५.५६८** | **१** | **<०.०५** |

सारणी क्रमांक ४ मध्ये पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांच्या शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनेबद्दल जागरुकतेसंबंधी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील सारणीत असे दिसून येते की ९७.२ टक्के लाभार्थी शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनेबद्दल जागरुकता होते. तर २.८ टक्के लाभार्थी शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनेबद्दल जागरूक नसल्याचे दिसून येते. पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांची शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनेबद्दल जागरूकतेनुसार तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ४४५.५६८: स्वातंत्र्यांश- १ ० मूल्य ८०.०५) फरक आढळून येते.. -

## निष्कर्ष

पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यादरम्यान इतर प्रकारचा (किरकोळ दु कान, लघुउद्योग, घरगुती व्यवसाय, इत्यादी) व्यवसाय करणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे निदर्शनास येते, म्हणजेच व्यवसाय करणाऱ्या मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांची संख्या महत्त्वपूर्णपणे अधिक आहे..

व्यवसाय सुरु करून ०-५ वर्ष झाले असणाऱ्या मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यांची संख्या महत्वपूर्णपणे कमी आहे. पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजना लाभार्थ्यादरम्यान शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनेबद्दल जागरुक असणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

## संदर्भसूची

1. Aggarwal, M. (2021). A Study on Beneficiaries of Mudra Yojna in Haryana, Journal of Contemporary Issues in Business & Government, 27(3), pp. 1100- 1103

2 Akhila, 1 K (2017). Mudra: Need and performance analysis, Trans Asian Journal of Marketing & Management Research, 6(8), pp. 5-18.

3. Ali, M. S and Kaveri, V. S. (2019). Mudra Loans-An Analysis for future Lending, Journal of Commerce and Management Thought, 10(3), pp. 291-308.

4. Antony, J. (2021). "Role of mudra yojana in employment generation a study with special reference to self-employed women in emakulam", JournalNX-A Multidisciplinary Peer Reviewed Journal, 7(4), pp. 217-223.

5. Aravindaraj. K and Bala, J. G. (2018). Performance Analysis of PMMY in South India, IOSR Journal of Business and Management, 20(1), pp. 24-28.

6. Basak, A. (2020). Mudra Initiatives for Funding to Msme: A Big Step for Pushing Financial Inclusion in India. Time's Journey, 9(2), pp. 45-53.

7 Bassi, P. (2016). Role of Mudra Bank on Make in India, International Journal in Management & Social Science, 407), pp. 654-657.

8 Bhaskar, B. (2019). Comparative Performance of Pradhan Mantri Mudra Yojana (PMMY) in West Bengal and other select states in India, Parikalpana KIIT Journal of Management, 15(4), pp. 153-165.

9 Bhayana, G. Kumar, R. and Bhayana, G. (2020) Role of Mudra Yojana in Entrepreneurship Development, Pacific Business Review International, 13(4).

10. Biswas, B. (2019). Comparative Performance of Pradhan Mantri Mudra Yojana (PMMY) in West Bengal and other select States in India. Parikalpana - KIIT Journal of Management, 15, pp. 153-165